## नि. क्र. १ खालील आदेश

**१.** अर्जदार नामे महोदव गुलाब बो—हाडे यांनी प्रस्तुत अर्ज भारतीय न्याय संहिता कलम ५०३ प्रमाणे पिंपरी पोलीस स्टेशन, पुणे यांनी कंप्लेंन्ट/पोहच क्र. ३१९०२२६००२८३५१ मधील जप्त केलेली अर्जदार यांची रक्कम रुपये ४,०६,११६.३५/— सुपूर्तनाम्यावर परत मिळणेकरीता दाखल केला आहे.

**२.** प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने पिंपरी पोलीस स्टेशन/पिंपरी सायबर पोलीस स्टेशन, पिंपरी शहर यांचे म्हणणे मागविण्यात आले. त्याप्रमाणे तपासी अधिकारी यांनी लेखी म्हणणे दाखल केले आहे.

**३.** अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ जप्त रक्कमेबाबत संगणीकृत स्टेटमेंट अर्जदार यांचे ओळखपत्र इत्यादींच्या पडताळणी केलेल्या प्रती दाखल केल्या आहेत. तपासी अधिकारी यांनी दाखल केलेल्या लेखी म्हणण्यानुसार सदर रक्कम नमूद गुन्हयामध्ये/ सायबर तक्रारीमध्ये जप्त करण्यात आलेली आहे. अर्जदाराने तीला समोरील संशयीत व्यक्तीने कसे आमीष दाखविले त्याच्या बोलण्याला कसे बळी पाडले याबाबतचे मॅसेजेस देखील अभिलेखावर दाखल केले आहेत. सायबर पोलीसांनी असे देखील सांगितले आहे की, आरेपीच्या संशयीत व्यक्तीच्या फ्रीज केलेल्या खात्यावर रु. ४,०६,११६.३५/— पेक्षा अधिक रक्कम जमा आहे.

**४.** मा. सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई अंबालाल देसाई— वि— स्टेट ऑफ गुजराथ (Special Leave Petition (Cri) 2745 of 2022) या न्यायानिवाडयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ प्रमाणे तसेच जप्त करण्यात आलेल्या मुददेमालाच्या अनुषंगाने निर्देश दिलेले आहेत.

**५.** अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज, तपासी अधिकारी यांचे लेखी म्हणणे व त्याअनुषंगाने दाखल केलेले कागदपत्र तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचे वर नमूद न्यायनिवाडयातील निर्देशानुसार, अर्जदार यांचा अर्ज खालील अटी व शर्तीनुसार मंजूर करण्यात येतो. करीता खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** निरीक्षक, पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी/सायबर पोलीस स्टेशन, पिंपरी शहर यांना आदेशीत करण्यात येते की, कंप्लेन्ट /पोहच क्र. ३१९०२२६००२८३५१ मधील जप्त म्हणजे बॅकेने फ्रिज /लिन करुन ठेवलेली डिफ्रीज करुन /लिन कसडून रक्कम ४,०६,११६.३५/—अर्जदार यांना रक्कम रुपये ४,०६,११६.३५/— इतक्या स्वरुपाच्या सुपूर्तनामा मुद्रांका आधारे देण्यात यावी. त्याकरीता पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी व सायबर पोलीस स्टेशन, पिंपरी/संबंधीत विभाकग यांनी या आदेशाची ताबडतोब पुर्तता होईल अश्या पध्दतीने पावले उचलावित.

**३.** संबंधित बॅक म्हणजे वर नमूद बॅकेच्या अर्जदाराने सांगितलेल्या/नमूद केलेल्या तसेच त्या बॅकेच्या पिंपरी मधील संबंधीत शाखांना आदेशीत करण्यात येते की, अर्जदार याने नमूद केले खाते ६४६१०१५०८५०५ या खात्यावर, वरीलप्रमाणेची रक्कम संबंधीत बॅकातील संबंधीत खतो हे डिफ्रीज करुन बॅकेचे नियमाप्रमाणेची पुर्तता करुन संबंधीत बॅकेने अर्जदार यांचे खातेवर/त्यांना प्रत्यक्षात सदरची रक्कम दयावी/अदा करावी. त्याकरीता अर्जदाराने या आदेशाची व अर्जाची प्रत बॅकेच्या अवलोकनार्थ मेलवर आणल्यास ते विचारात घ्यावेत. सदर बॅकोंना पूर्तता करण्याकरीता त्यांच्या इतर राज्यातील/जिल्हयातील बॅकेच्या झोनला/प्रादेशिक कार्यालय यांच्याशी संपर्क अथवा पत्रव्यवहार करावयाचा झाल्यास/ त्यांना आवश्यक वाटल्यास त्यांनी त्याप्रमाणेची सर्व पुर्ततास लवकरात लवकर/विना विलंब करावी.

**४.** अर्जदार यांनी सदर मुददेमालामध्ये कोणत्याही प्रकारचे फेरबदल, हस्तांतर अथवा त्यांच्या मुळ स्वरुपात प्रकरणाचा निकाल लागेपावेतो बदल करु नये किंवा कोणत्याही अन्य मार्गाने विल्हेवाट लावू नये.

**५.** निरीक्षक, पिंपरी पोलीस स्टेशन/ पिंपरी सायबर पोलीस स्टेशन, पिंपरी शहर यांनी जप्त मुददेमाल व त्यांच्या वर्णनाा तपशिलवार पंचनामा करुन जप्त मुददेमालाचे छायाचित्र जतन करावे व सदर मुददेमालाच्या

परतीच्या अनुषंगानेची सर्व कागदपत्र व अभिलेखावर रितसर जतन करावे.

**६.** अर्जदार यांनी सदर जप्त मुददेमाल व त्याची कागदपत्रे तपासी अधिकारी यांना तपासादरम्यान आवश्यक्ता भासल्यास संबंधित कार्यालय येथे हजर करावे.

( आदेश खुल्या न्यायालयात घोषित )

WAGHMARE KUNAL KUMAR
Digitally signed by WAGHMARE KUNAL KUMAR
Date: 2026.08.14 17:28:55 +0530

(के.के.वाघमारे)
दिनांकः— १४.०८.२०२६. ७वे प्रथम वर्ग न्यायंदडाधिकारी, पिंपरी.